REGISTERED No. B 3434

जा हिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ३० मार्च, १९३८ अंक १३

## कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

[ स्थापना : १९१७ ]

बँक गेलीं पांच वर्षें ( अ ) वर्गांत आहे.

चालू ठेवीवर द. द. शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर अडीच टक्के व्याज दिलें जातें व चेकनें पैसे काढतां येतात. बँकेकडून मुदत ठेवीहि खालील दराप्रमाणें स्वीकारण्यांत येतात.

१ वर्ष मेंबर ३½% नॉन-मेंबर ३%
२ वर्ष मेंबर ४% नॉन-मेंबर ३½%

विशेष माहिती पत्रद्वारें पुरविली जाईल.

कर्जें—फक्त सभासदांना जामिनकीवर, स्थावराच्या तारणावर, सोनें अगर चांदी व जंगम मालाच्या तारणावर दिलीं जातात.

चेक, हुंड्या, खरेदी, विक्री केली जाते. तसेंच रेल्वे रिसीटची वसुली योग्य कमिशनवर केली जाते. ठराविक विमा कंपन्यांचे हप्ते घेतले जातात. सर्व तऱ्हेचा बँकिंग व्यवहार केला जातो.

कराड. व्ही. पी. जोशी,
जि. सातारा. मॅनेजिंग डायरेक्टर.

## —कार्यक्रम—

( १ ) वर्षप्रतिपदेला ( चैत्र शुद्ध १ ) मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.

( २ ) १९३९ च्या जानेवारींत साखर करण्यास प्रारंभ.

दरवर्षी ५॥ टक्के व्याज
व
दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेलः—

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.

२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

विक्रीस तयार ] विक्षिप्तराव [ दुसरी आवृत्ति

लेखकः—प्रो. वा. गो. काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. 'विक्षिप्तराव' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे.

## विविध माहिती

### हत्तींची हत्या

आफ्रिकेमध्यें दरसाल सुमारें ३६½ हजार हत्तींची हस्तिदंताकरितां हत्या करण्यांत येते. नवीन जन्मणाऱ्या हत्तींची संख्या त्या मानानें अत्यल्प आहे.

### व्यापारी करार करण्यापूर्वी कायदेमंडळाची संमती

हिंदुस्थान व इतर देश ह्यांमधील व्यापारी करारावर हिंदुस्थान सरकारतर्फे सही होण्यापूर्वी मध्यवर्ती कायदेमंडळाची मंजुरी लागत नाहीं, ती आवश्यक असावी अशी रूढि पाडण्यांत यावी, असें इंडियन मर्चंटस चेंबरनें सरकारास सुचविलें आहे.

### हरिपुरा येथील रस्त्यांप्रीत्यर्थ पाउण लक्ष रु. खर्च

हरिपुरा येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे वेळीं, तेथें जाणाऱ्या लोकांच्या सोईसाठीं मुंबई सरकारनें रस्ते सुधारले व त्याप्रीत्यर्थ ७२ हजार रुपये खर्च केले.

### टेक्स्टाइल लेबर इन्क्वायरी कमिटी

कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगारांच्या मजुरीचे दरांबाबत चौकशी करण्यासाठीं मुंबई सरकारनें कमिटी नेमली आहे, तिचा पूर्ण रिपोर्ट मुंबई सरकारकडे येण्यास अद्याप कांहीं महिने लागतील. आजतागायत ह्या कमिटीप्रीत्यर्थ १३,२७० रु. खर्च झाला आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ९ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर १ रु. ९ आ. ९ पै इतका पडला.

### चौकशी अर्जावर स्टँप लावण्याची आवश्यकता नाहीं

सरकारी कचेऱ्यांच्या मुख्यांकडे चौकशी अर्ज करतांना त्यांवर कोर्ट फी स्टँप लावण्याचें कारण नाहीं, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. माहिती मागविणारा अर्ज कोर्ट फी ॲक्टाचे कक्षेंत येत नाहीं.

### शेतीच्या उत्पन्नावर कर

मद्रास प्रांतांत शेतीच्या उत्पन्नावर कर बसवण्याच्या हेतूनें तेथील सरकार कायद्याचा मसुदा तयार करीत आहे.

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारास १९३६-३७ सालीं कस्टम्सचें उत्पन्न ५५½ कोटि रुपये मिळालें आणि त्याच्या वसुलीस एक कोटि रुपयांपेक्षा थोडा कमी इतका खर्च आला.

### बेल्जम बॉंड्स—सावधगिरी बाळगा

बेल्जमच्या सरकारनें विकलेल्या कर्जरोख्यांची विक्री करणारे अधिकृत एजंट ह्या देशांत नाहींत आणि त्यासंबंधांत बाहेरील देशांत लबाड्या होतात; तरी लोकांनीं सावध असावें अशी सूचना मद्रास येथील बेल्जम कॉंसलनें केली आहे, ती जनतेनें लक्षांत ठेवावी.

### सन लाइफ ॲशुअरन्स कं. ऑफ कॅनडा

वरील कंपनीनें १९३७ सालीं एकूण ६८½ कोटि रुपयांच्या पॉलिसी दिल्या. ३१ डिसेंबर, १९३७ अखेर कंपनीकडे ७ अब्ज, ९३½ कोटि रुपयांचे विमे चालू होते.

### ग्रेटब्रिटनमधील गॅसचा धंदा

ग्रेटब्रिटनमधील सुमारें ८० लक्ष स्त्रियांचा स्वयंपाक गॅसशेगड्यांवर होतो. गॅस कंपन्यांचें काम थांबलें, तर कोळशाचा खप कमी होईल व कोळशाच्या खाणींत काम करणारे ७० हजार मजूर बेकार होतील. गॅस करण्यासाठीं दरसाल १ कोटि ८० लक्ष टन कोळसा लागतो.

### दक्षिण अमेरिकेंतील चित्रपट

दक्षिण अमेरिका खंडांतील देशांत ब्रिटिश चित्रपटांस अमेरिकन फिल्म्सनीं मागें टाकलें आहे. खुद्द ब्रिटिश इतिहासाचें चित्रीकरण अमेरिकनांइतकें ब्रिटिशांस साधत नाहीं! तेथील देशांत दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटांपैकीं शेकडा ७० अमेरिकन असतात. फ्रेंच व जर्मन चित्रपटांची लोकप्रियता वाढत आहे.

### मोफत शारीरिक शिक्षण वर्ग

पुणें येथील महाराष्ट्रीय मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणें यंदाहि स्त्रिया व पुरुष ह्यांसाठीं मे महिन्याचे सुट्टींत शारीरिक शिक्षण वर्ग चालविण्यांत येणार आहे. परगांवच्या लोकांच्या सोईकरितां तात्पुरतें वसतिगृह उघडण्यांत येईल. नोंदणी फी ( १ रु. ) सह अर्ज २७ एप्रिल, १९३८ चे आंत पाठवावे.

### टेलिफोनचा उपयोग करणारा आद्य ग्राहक

१८७४ सालीं ॲलेक्झांडर ग्रॅहॅम बेल ह्यानें प्रथम टेलिफोन तयार केला. त्याच्या पहिल्या ग्राहकांपैकीं एक, ह्यू नेल्सन, हा नुकताच टोरँटो येथें वयाच्या ९४ व्या वर्षीं मरण पावला. १८७७ पासून अखेरपर्यंत त्याचे घरीं टेलिफोन होता.

### ग्रेटब्रिटनमधील टेलिफोन

ग्रेटब्रिटनमधील ३,२८६ टेलिफोन एक्सचेंजेसपैकीं २,३५५ ऑटोमॅटिक असून त्यांस जोडलेल्या कोणत्याहि टेलिफोनचा नंबर तबकडी फिरवली असतां मिळतो. एकट्या लंडन शहरामध्यें ११ लक्ष टेलिफोन वापरांत आहेत. गेल्या वर्षी त्यांतून १ अब्ज, १० कोटि वेळां लोक बोलले. पोस्टखात्याच्या टेलिफोन शाखेंत २५ हजार लोक कामावर आहेत.

### हंगेरींतील प्रत्येक जण नंबरानें ओळखला जाणार

हंगेरीमध्यें जन्मास येणाऱ्या प्रत्येक मुलास ह्यापुढें एक नोंदणीनंबर देण्यांत येईल व त्याच्या मृत्यूपर्यंत ह्या नंबरानेंच त्याची गणति केली जाईल.

### धंदेवाइक खेळाडूंचा तनखा

इंग्लंड-ऑस्ट्रेलियामधील १९३८ मधील क्रिकेटच्या कसोटीच्या सामन्यांतील धंदेवाइक ब्रिटिश खेळाडूंस प्रत्येक सामन्याकरितां सुमारें ६५० रु. मिळणार आहेत. रेल्वे भाडेंहि त्यांस मिळेल व नियोजित हॉटेलांत उतरल्यास तेथील खर्च खेळाडूंवर पडणार नाहीं.

### ताप्ती व्हॅली रेल्वे

गेल्या वर्षाबद्दल ताप्ती व्हॅली रेल्वे कंपनीनें भागीदारांस ८ टक्के डिव्हिडंड व १ टका बोनस दिलें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| १३-३-३८ ते १९-३-३८ | ९,८१,०९५ |
| २०-३-३८ ते २६-३-३८ | ६०,८०,५८३ |
| २१-९-३१ ते २६-३-३८ | ३१२,६०,०९,९५९ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १४६ | ५ हिंदुस्थानांतील स्वदेशी चळवळ व लँकेशायर | १५१ |
| २ प्रांतिक सहकारी चळवळ | १४७ | ६ मालावरील करांत मुंबईचा हिस्सा ... | १५१ |
| ३ पौंड म्हणजे काय? ... | १४८ | ७ कोकणांतील सहकारी परिस्थिति ... ... | १५२ |
| ४ स्फुट विचार... ... | १४८ | ८ परराष्ट्रीय हुंडणावळ | १५३ |
| स्वदेशी साखरेस संरक्षण चालू रहाणार—"स्वदेशी"ची महात्माजींनी केलेली व्याख्या–युरोपियन व्यापारी व मालावरील कर—वरील प्रश्नाचें रहस्य–मोटार वहातुक नियंत्रण | | ९ तांबवे को. लिफ्ट इरिगे-सोसायटी ... ... | १५४ |
| | | १० निवडक बाजारभाव | १५५ |



# अर्थ

बुधवार, ता. ३० मार्च, १९३८


## प्रांतिक सहकारी चळवळ

### श्री. मुरारजी ह्यांची स्पष्टोक्ती

प्रांतिक विधिमंडळांत अंदाजपत्रकांत नमूद असलेल्या खर्चाच्या रकमांस मंजूरी सरकार मागतें, त्याप्रसंगीं निरनिराळया खात्यांच्या कारभारावर टीका व त्यांच्या सुधारणेविषयीं सूचना करण्याची संधी सभासदांस मिळते आणि आपल्या धोरणाचें स्पष्टीकरण व समर्थन जबाबदार मंत्र्यांस करतां येतें. चर्चेसाठी राखून ठेवलेल्या दिवसाच्या मुदतींत सहकारी चळवळीसंबंधाच्या चर्चेस वेळ राहूं नये आणि तो विषय वादविवादांतून गळावा असा विलक्षण योगायोग कांहीं वर्षें मुंबईच्या कायदेमंडळांत घडून आलेला आहे. ह्या कारणानें सहकारी चळवळीबाबतच्या तक्रारी जाहीर रीतीनें पुढें मांडल्या जाणें आणि त्यांच्याबद्दलचें सरकारचें म्हणणें जनतेस स्पष्टपणानें समजणें ह्या गोष्टी शक्य झालेल्या नाहींत.यंदाच्या सालीं असाच प्रकार होतो कीं काय अशी भीति वाटत होती,ती गेल्या आठवड्यांत श्री.मुरारजी ह्यांनीं सहकारी खात्याच्या खर्चास लागणाऱ्या रकमेस मंजुरी मागितली तेव्हां सुचवण्यांत आलेल्या कपातीच्या अनुषंगानें झालेल्या चर्चेनें दूर केली आहे. प्रांतिक सहकारी चळवळीची सध्याची असमाधानकारक परिस्थिति सुधारण्यास उपाय सुचवण्यासाठी सरकारनें रजिस्ट्रार श्री. भणसाळी व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांची नेमणूक केली होती. त्यांच्या शिफारसींपैकी प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या पुनर्घटनेसंबंधाच्या सूचनेविरुद्ध सहकाऱ्यांमध्यें असंतोष उत्पन्न होऊन तो जोरानें जाहीर करण्यांतहि आलेला आहे. चौकशीचें काम वरील दोघांवरच सोपवण्यांत आलें आणि त्यांत लोकमत प्रातिनिधिक रीतीनें व्यक्त होण्यास संधी देण्यांत आली नाहीं अशीहि ओरड झाली होती. ह्या कारणानें कायदेमंडळांत सरकारवर प्रतिकूल टीकेचा भडिमार होऊन सहकारी चळवळीबद्दल जबाबदार असणाऱ्या मंत्र्यांस तिला समाधानकारक उत्तर देणें कठीण होईल असें वाटण्यास जागा होती. परंतु गेल्या आठवड्यांत विधिमंडळामध्यें सुचवण्यांत आलेल्या कपातीवर जो वादविवाद झाला, त्यावरून अपेक्षित वादळ उठलेंच नाहीं आणि श्री. मुरारजी ह्यांचें टीकेस उत्तर देण्याचें कार्य अत्यंत सुकर झालें असें दिसून येतें. एवढेंच नव्हे, तर टीकाकारांचीं भाषणें विधायक, सूचनात्मक व पुष्टिदायक होऊन मंत्र्यांस सरकारची बाजू किती मजबूत आहे हें स्पष्टोक्तीच्या सहायानें सिद्ध करतां आलें. श्री. मुरारजी ह्यांची सडेतोडपणानें बोलण्यासंबंधानें प्रसिद्धि आहे आणि त्या आपल्या विशेष गुणाचा मासला वरील प्रसंगीं उत्तरादाखल केलेल्या भाषणांत त्यांनीं दाखविला.

सहकारी चळवळीच्या उपयुक्ततेसंबंधाचा आपला दृढ विश्वास व्यक्त करून मुंबई इलाख्यांत ती सर्वस्वी अयशस्वी झाली असल्याविषयींची कल्पना चुकीची असल्याचा स्वतःचा अभिप्राय सहकार-मंत्र्यांनीं असंदिग्ध रीतीनें व्यक्त केला ही समाधानाची गोष्ट आहे. भलतीच माणसें ह्या चळवळींत शिरून त्यांनीं अनेक ठिकाणीं गोंधळ माजविला आहे आणि स्वार्थत्यागी व सार्वजनिक कार्याची हौस व पात्रता अंगीं असलेल्या लोकांचें वजन तिच्या कारभारांत पडूं लागल्यास सुधारणा व प्रगति सुकर होईल असें त्यांनीं सांगितलें. सद्यःस्थितीबद्दल कोणासहि दोष न देतां सर्वांच्या सहायानें पुनर्घटनेचें कार्य चालवण्याची तयारी दर्शवून प्रॉव्हिन्शिअल इन्स्टिट्यूट संबंधानें अपरिहार्य म्हणून सरकारनें केलेल्या शिफारशींचा स्वीकार करण्यांत यावा असें श्री. मुरारजींनीं सुचवलें. पतपेढ्यांत अपात्र लोकांस कर्जें देण्यांत आलीं आणि कर्जांचा उपयोग उत्पादक कार्याकडे करण्यांत न येतां कित्येक स्वार्थसाधू लोकांनीं स्वतःचे खिसे भरले, ह्या कारणानें सहकारी चळवळीची स्थिति बिघडली असल्याचें निर्भीडपणानें सांगून सोसायट्यांच्या पैशाचा दुरुपयोग कसा होतो ह्याविषयींचीं स्वानुभवाचीं उदाहरणेंहि त्यांनीं दिलीं-चळवळीच्या सद्यःस्थितीची चौकशी करण्यास अनेक सभासदांची कमिटी नेमली असती तर मतभेद व निष्कारण कालक्षेप झाला असता असें स्पष्टीकरण त्याविषयींच्या टीकाकारांस अनुलक्षून त्यांनीं केलें. चांगले निःस्वार्थी कार्यकर्ते उपलब्ध होण्यावर सहकारी चळवळीची यशस्विता अवलंबून आहे आणि याबाबत अनुकूल परिस्थिति असेल तेथेंच आपण नवीन संस्था काढण्यास परवानगी देऊं असेंहि मंत्र्यांनीं निक्षून सांगितलें. चळवळीच्या हितासाठी तिच्या कारभारांत सरकारला हात घालणें आवश्यक वाटल्यास तसें करण्यास आपण कचरणार नाहीं आणि अनिष्ट लोक चळवळींतून बाहेर निघतोंपर्यंत चळवळ सर्वस्वी लोकसत्तानुवर्ती होणें शक्य नाहीं. सहकारी संस्था लोकांनीं स्वतःच्या जबाबदारीवर चालवाव्या असेंच सरकारचें मत आहे आणि तसें होण्यास तें उत्तेजन देईल. परंतु स्वार्थी लोकांचें वर्चस्व व गोंधळ तें चालू देणार नाहीं अशा प्रकारचें आपलें धोरण राहील, हें श्री. मुरारजींनीं ठासून सांगितलें. मुंबई सरकारच्या मंत्र्यांनीं ह्या रीतीचें निश्चयात्मक व ठसकेबाज भाषण प्रांतिक कायदेमंडळांत केल्याचें उदाहरण अनेक वर्षांत घडलेलें नाहीं ह्याविषयीं संशय नाहीं. सहकारी चळवळीचें अंतरंग नीट समजून घेऊन तिची सुधारणा घडवून आणण्यासाठी जरूर ते उपाय अमलांत आणण्याचें मंत्र्यांनीं ठरविलें आहे हें मागील आठवड्यांतील त्यांच्या विस्तृत व सडेतोड भाषणावरून सिद्ध होतें. सहकारी चळवळींत मुरलेल्या कित्येक सभासदांच्या विधानांवरून आणि टीकाकारांच्या

सूचनांच्या सुगावरून कायदेमंडळानें श्री. मुरारजी ह्यांच्या घोरणास पाठिंबा दिला आहे, ह्यांत शंका रहात नाहीं. सहकारी कार्यकर्त्यांनीं ही गोष्ट नीट लक्षांत घेतली पाहिजे. प्रांतिक इंस्टिट्यूटच्या पुनर्घटनेची सरकारची योजना नापसंत असूनहि तिच्यामध्यें शक्य ते फेरबदल विधायक सूचना करून घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनीं करणें इष्ट आहे.

---

## "पौंड" म्हणजे काय ?—नांवांत मोठेपणा नाहीं, गुणांत आहे.

राष्ट्रीय चलनाचा सोन्याचा आधार सुटला आणि जागतिक व्यापाराच्या देवघेवींत मागणी-पुरवठ्याच्या परस्परसंबंधांस अनुसरून त्याची किंमत ठरूं लागली म्हणजे आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांविषयीं कसा घोटाळा उडतो ह्याचें एक ठळक उदाहरण नुकतेंच घडलें आहे, तें मोठें बोधप्रद आहे. "पौंडा"च्या किंमतीबाबतच्या कराराविषयींचा वादग्रस्त प्रश्न प्रिव्ही कौन्सिल पर्यंत जाऊन त्यानें दिलेला निर्णय प्रसिद्ध झाला आहे. न्यूझीलंडमध्यें रजिस्टर झालेल्या जे. बॅलंटाइन अँड कंपनीची लंडनमध्यें एक शाखा आहे. ह्या शाखेच्या वतीनें इंग्लंडांत कपडे बेतण्याच्या कामांत निष्णात असलेल्या एका शिंप्याशीं करार झाला. त्याअन्वयें ह्या गृहस्थानें न्यूझीलंडमध्यें दर वर्षास ७०० "पौंड स्टर्लिंग" इतक्या पगारावर तीन वर्षें काम करावयाचें होतें. इंग्लंड व न्यूझीलंड ह्या दोन्ही देशांतल्या मुलभूत चलनास "पौंड" हेंच नांव आहे. तेव्हां न्यूझीलंडमधल्या पौंडांत तेथील नोकरांस पगार देणें योग्य आहे असें सकृत्दर्शनीं वाटेल आणि तेथील मुख्य कोर्टानें असाच निकाल दिला. ज्या ठिकाणीं काम तेथील पौंडांत पगार हें तत्व प्रिव्ही कौन्सिलनें मात्र मान्य केलें नाहीं. कारण, मूळ करारांत "पौंड" शब्दापुढें "स्टर्लिंग" असा शब्द घातलेला होता आणि तो ब्रिटिश चलनासच लावतात; इतरांस नाहीं. हें भांडण केवळ शाब्दिक नव्हतें हें येथें लक्षांत ठेवावयाचें आहे. कराराच्या वेळीं व पुढें ब्रिटिश पौंडाशीं तुलना करतां न्यूझीलंडच्या पौंडाची सोन्याच्या मानानें होणारी किंमत दहा ते वीस टक्के कमी होती. म्हणजे, ७०० ब्रिटिश पौंड स्टर्लिंगला जेवढा माल विकत घेतां आला असतां त्यापेक्षां दहा ते वीस टक्के कमी माल ७०० न्यूझीलंडच्या पौंडांनीं मिळाला असता. त्यांत बॅलंटाइन कंपनीचा फायदा होता, पण त्याच मानानें शिंप्याचें नुकसान होतें. करारांत " स्टर्लिंग " ही संज्ञा पौंडापुढें नसती तर हा कोणत्या देशांतला पौंड आहे हें निश्चित झालें नसतें आणि जेथें काम तेथील पौंड हें तत्त्व सरळ लागू करतां आलें असतें. कोणत्याहि देशाच्या परराष्ट्रीय येण्या-देण्याच्या मानानें तेथील चलनाची जागतिक किंमत ठरते. नुसत्या नामसादृश्यानें ती निश्चित होत नाहीं. ज्याप्रमाणें एकाच नांवाचीं दोन माणसें असलीं म्हणून तीं अंगच्या गुणांत सारखीं असतात असें नाहीं, त्याचप्रमाणें चलनास सोन्याचा किती आधार असेल त्या मानानें त्याची किंमत कमीज्यास्त होईल. माणसांच्या खऱ्या कर्तबगारीला जसें मोल आहे, तसेंच मोल कोणत्याहि चलनाच्या पदार्थ विकत घेण्याच्या शक्तीला आहे. सोन्याशीं चलनाचें किंमतीचें प्रमाण ही त्याच्या शक्तीची कसोटी आहे. मोठ्या नांवामुळें मनुष्य मोठा होत नाहीं. ' दिसनेमे ढब्बू और चलनेमे शिवराई ' ही म्हण प्रसिद्धच आहे.

---

# स्फुट विचार

### स्वदेशी साखरेस संरक्षण चालू रहाणार

सात वर्षांमागें टारिफ बोर्डाच्या शिफारशीवरून हिंदी स्वदेशी साखरेस पुरेसें जकातीचें संरक्षण देण्याचें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें आणि ह्या महिना अखेर त्याच बोर्डाच्या सूचनेस अनुसरून संरक्षक जकात किती कमी ज्यास्त करावयाची हें निश्चित होणार होतें. पूर्वी ठरल्याप्रमाणें टारिफ बोर्डानें चौकशी करून आपला रिपोर्ट सरकारकडे पाठवल्यास कांहीं महिने होऊन गेले आहेत आणि साखरेवरील जकातींत कांहीं फेरबदल करावयाचा असल्यास त्या विषयींचा कायदा ह्याच वेळेच्या सुमारास मध्यवर्ती कायदेमंडळापुढें यावयास हवा होता. परंतु टारिफ बोर्डाच्या रिपोर्टांत कित्येक तपशीलाच्या विधायक सूचना केलेल्या असल्या पाहिजेत आणि त्या सर्वांचा सांगोपांग विचार करून त्यांवर आपलें मत बनवण्यास सरकारास सवड झालेली नाहीं, असें दिसतें. नाहींतर बोर्डाच्या सूचनांचा अंतर्भाव करून सरकारनें त्याबाबतच्या कायद्याचें बिल असेंब्लीपुढें मांडलें असतें. टारिफ बोर्डाच्या शिफारसी व्यापक स्वरूपाच्या असून त्यांपैकीं कांहीं सरकारच्या दृष्टीनें वादग्रस्त असाव्या असा तर्क आहे. निदान त्यांचा योग्य निकाल वेळेवर होणें कठीण झालें आहे ह्यांत शंका नाहीं. गेल्या आठवड्याचे शेवटीं व्यापारी खात्याच्या चिटनवीसांनीं साखरेच्या धंद्याचे संरक्षणाबाबतचें बिल असेंब्लीपुढें मांडलें, त्यांत चालू असलेलें संरक्षण आणखीं एक वर्ष आहे तसेंच रहावें अशी तरतूद केली असून टारिफ बोर्डाच्या शिफारसींविषयींचा सरकारचा निर्णय ३१ मार्च, १९३९ च्या पूर्वी कायदेमंडळास सादर केला जाईल असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. म्हणजे, स्वदेशी साखरेस १९३२ सालीं दिलेलें संरक्षण आणखी एक वर्ष चालू रहाणार व नंतर त्यांत कमी-ज्यास्त जरूरीप्रमाणें होणार.

---

### "स्वदेशी"ची महात्माजींनीं केलेली व्याख्या

ज्याच्या बनावटीमध्यें कच्ची सामुग्री, यंत्रें, भांडवल, मजुरी व व्यवस्था हीं सर्व १०० टक्के देशी आहेत त्या मालासच " स्वदेशी " समजून उत्तेजन द्यावें कीं भांडवल वगैरेच्या बाबतींत तारतम्यबुद्धीनें ही व्याख्या थोडीशी ढिली करून कोणताहि धंदा हिंदी लोकांच्या सत्तेखालीं असल्यास त्यास " स्वदेशी " म्हणण्यास हरकत नाहीं ह्या संबंधानें अनेक वेळां भिन्न मतें प्रदर्शित केलीं जातात आणि वाद माजतो. कित्येक धंदे असे आहेत कीं ते ह्या देशांत हिंदी लोकांनीं चालवावयाचे म्हटल्यास त्यांचीं यंत्रें व कच्चा माल पूर्णपणें स्वदेशी असूं शकत नाहीं. धंदा सर्वतोपरी १०० टक्के देशी असेल तरच तो खरा स्वदेशी व उत्तेजनास पात्र आहे असें म्हटल्यास हिंदुस्थानची आर्थिक प्रगति तात्काळ खुंटेल. शक्य तितकी सामुग्री व साधनें स्वदेशी वापरून हिंदी लोकांनीं स्वतःच्या हिंमतीवर व सत्तेनें धंदा काढल्यास व चालविल्यास त्यास " स्वदेशी " ची व्याख्या लागू करण्यांत आली पाहिजे. महात्मा गांधींनीं आपला अभिप्राय स्पष्ट रीतीनें व्यक्त करून ह्या संबंधांतल्या शंकांचें निवारण नुकतेंच केलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. "ज्यांमध्यें सत्ता, नेतृत्व व व्यवस्था हिंदी लोकांचे हातीं आहे ( ते मॅनेजिंग डायरेक्टर असोत किंवा मॅनेजिंग एजंट असोत )

ते धंदे स्वदेशी समजण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत जरूर तें भांडवल किंवा ज्ञान हीं उपलब्ध नसल्यास तीं परदेशांतून घेतलीं तरी चालतील, परंतु तीं सर्वस्वी हिंदी सत्तेखालीच उपयोगांत आणलीं पाहिजेत आणि त्यांचा उपयोग हिंदुस्थानच्या हिताकरितां झाला पाहिजे." हा महात्माजींचा खुलासा मननीय आहे आणि त्याचे योगानें स्वदेशीविषयक अनेक वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय लागत आहे. परकीयांच्या सत्तेनें व त्यांच्या फायद्यासाठी चाललेले धंदे, त्यांत कांहीं हिंदी लोक आहेत किंवा त्यांतल्या भांडवलाचा कांहीं भाग हिंदी आहे एवढ्यानें स्वदेशी होत नाहींत. त्यांची व्यवस्था, सत्ता व नेतृत्व हिंदी आहे किंवा नाहीं हा येथें निर्णायक प्रश्न आहे.

---

### युरोपिअन व्यापारी व प्राप्तीवरील कर

हिंदुस्थानांत राहून धंदा करणाऱ्या परंतु कायमचें रहाण्याचें ठिकाण ह्या देशाच्या बाहेर असणाऱ्या लोकांच्या सबंद प्राप्तीवर येथें कर आकारण्यांत यावा कीं केवळ हिंदुस्थानांत मिळालेल्याच त्यांच्या प्राप्तीवर कराची आकारणी व्हावी हा अत्यंत महत्त्वाचा तात्त्विक व व्यावहारिक प्रश्न आहे. हिंदुस्थान सरकारचा प्राप्तीवरील कर ह्या देशांतच मिळणाऱ्या प्राप्तीवर घेण्यांत यावा आणि दुसरीकडे मिळालेल्या प्राप्तीवर त्याचा बोजा पडूं नये हें सकृद्दर्शनीं न्याय्य दिसतें. ह्या देशांत ज्याची कायमची वसती नाहीं अशा माणसास इतर ठिकाणीं मिळकत झाली तर तिच्यावर कर बसवण्याचा हक्क हिंदुस्थान सरकारास पोहोंचत नाहीं असें तो म्हणणार आणि तें म्हणणें दिसावयास सरळ आहे. हिंदुस्थान सरकारनें प्राप्तीवरील कराच्या व्यवस्थेबाबत सल्ला देण्यासाठी नेमलेल्या तज्ज्ञांच्या कमिटीनें अभिप्राय व्यक्त केला आहे, तो मात्र ह्या कल्पनेच्या विरुद्ध आहे. ह्या देशांत उद्योगधंदा करणाऱ्या युरोपिअनांस तो अभिप्राय अर्थातच मान्य नाहीं, कारण त्यास अनुसरून हिंदुस्थानाबाहेर झालेलीहि त्यांची मिळकत हिंदी करास पात्र होणार आहे. मुंबईच्या युरोपिअन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, मि. कुक, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत आपल्या भाषणांत सदरहु विषयाचा उल्लेख केला आणि तज्ज्ञांच्या कमिटीनें व्यक्त केलेल्या मतास आपला विरोध ठामपणानें दर्शविला. हिंदुस्थानांत उद्योगधंद्याकरितां रहाणाऱ्या इसमाची, जगाच्या दुसऱ्या भागांत झालेली मिळकत ती ह्या देशांत आणली नाहीं, तरी केवळ तो तात्पुरता ह्या देशांत रहाता ह्याकारणानें प्राप्तीच्या करास पात्र करणें अन्यायकारक आहे असें त्यांनीं सांगितलें. ग्रेटब्रिटनमध्यें रहाणाऱ्या हिंदी लोकांकडून त्यांच्या तेथील किंवा तेथें केलेल्या प्राप्तीवरच कर घेण्यांत येतो आणि हेंच तत्त्व हिंदुस्थानांतील युरोपिअनांस लागू करणें योग्य आहे असें त्यांनीं प्रतिपादलें.

---

### वरील प्रश्नाचें रहस्य

एखाद्या इसमाच्या धंद्याच्या ठिकाणीं उत्पन्न न झालेली किंवा तेथें बाहेरून न आलेली अशी त्याची मिळकत प्राप्तीच्या करास पात्र करण्याचा हक्क जर कोणत्या देशास असेल तर तो त्या इसमाच्या मातृदेशास आहे, तात्पुरत्या वस्तीच्या देशास नाहीं, हें मि. कुक यांनीं प्रतिपादलेलें तत्त्व सूक्ष्म विचाराअंतीं मान्य होण्याजोगें नसून हिंदुस्थानसरकारच्या तज्ज्ञ सल्लागारांस पटलेलें नाहीं. एखादा जर्मन व्यापारी हिंदुस्थानांत राहून धंदा करीत आहे आणि त्यानें चीन देशांत व्यापारांत पैसा घालून फायदा मिळवला व तो पैसा ह्या देशांत न आणतां तेथेंच पुनः धंद्यांत घातला, तर ह्या त्याच्या बाहेरील मिळकतीवर कर घेण्याचा हक्क जर्मन सरकारास असावा, हिंदुस्थान सरकारास नसावा, असा मि. कुक ह्यांच्या सिद्धांताचा अर्थ होईल. ह्या देशांत राहून जगांत दुसरीकडे कमाई करणाऱ्या धंदेवाल्यांच्या प्राप्तीवर कर घेण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास जितका पोहोंचतो तितका तो केवळ त्याची मातृभूमि दुसरीकडे आहे म्हणून त्या दुसऱ्या देशास पोहोंचणें शक्य नाहीं, ही विचारसरणी अत्यंत सयुक्तिक आहे. हिंदुस्थानांत धंदा करीत असतां ह्या देशाच्याबाहेर भांडवल गुंतवून कमाई करणारे लोक त्या प्राप्तीवरील करामधून निसटणें ह्या देशाच्या सरकारास नुकसानकारक आहे. हिंदी लोकांच्या ग्रेटब्रिटनबाहेरील मिळकतीवर ब्रिटिश सरकार प्राप्तीवरील कर आकारीत नाहीं आणि हेंच तत्त्व हिंदुस्थानसरकारनें येथील ब्रिटिश लोकांस लागू करावें ह्या म्हणण्यांत स्वारस्य नाहीं. ग्रेटब्रिटनमधल्या हिंदी लोकांची त्या देशाबाहेरील मिळकत आणि हिंदुस्थानांतल्या युरोपिअनांची त्याच प्रकारची प्राप्ती या दोहोंमध्यें कितीसें साद्दश्य आहे? ह्या तत्त्वाच्या अंमलबजावणीमुळें ब्रिटिश व हिंदी सरकारांचें त्यांच्या उत्पन्नाच्या मानानें किती नुकसान होतें ह्याचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

---

### मोटार वहातूक नियंत्रण—सक्तीचा विमा

मध्यवर्ती असेंब्लींत, मोटार वहातुक बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवावें, ह्या सूचनेवर भाषण करतांना सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं बिलांतील महत्त्वाच्या कलमांचा खुलासा केला. सदरहु बिलाचें महत्त्व ध्यानांत बाळगून, कंपनी बिल व विमा बिल ह्या दोन बिलांप्रमाणेंच प्रस्तुत योजनेकडे सभागृह पाहील, अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. जुलै महिन्याचे सुमारास सिलेक्ट कमिटीची बैठक भरेल व असेंब्लीच्या पुढील अधिवेशनांत तिचा रिपोर्ट असेंब्लीपुढें विचारासाठीं येईल, अशी अपेक्षा आहे. मोटार वहातुक बिलांतील सक्तीच्या विम्याच्या योजनेंतील तत्त्व सर्वांस मान्य होण्यासारखें आहे. रस्त्यांत होणाऱ्या अपघातांबद्दल गाड्यांतील उतारू व रस्त्यानें जाणारे लोक ह्यांस नुकसानभरपाई मिळण्याची व्यवस्था व्हावी, ह्यासाठी अपघातांमधील दुखापतीचा व मृत्यूचा विमा उतरविण्यास मोटारवाल्यांवर सक्ती करणें आवश्यक आहे, अशी शिफारस रोटन कमिटीनें केली होती. नुकसानभरपाईची निश्चित अशी सध्या कसलीच योजना नाहीं. "हिंदुस्थानांत मोटारींच्या प्राणघातक अपघातांचें प्रमाण १० हजार गाड्यांस ९३ इतकें भारी पडतें; इतर कोणत्याहि देशांतील तत्सम प्रमाणापेक्षा हें प्रमाण दुपटीनें अधिक आहे; अपघातांत सापडलेले लोक बहुशीं गरीब असल्यानें व कित्येक प्रसंगीं त्यांचेवरच कुटुंबाचें पोषण अवलंबून असल्यानें, त्यांस नुकसानभरपाई मिळणें अत्यवश्यक ठरतें; मोटार वहातुकीच्या धंद्यांत अनिष्ट स्पर्धेमुळें जास्त खर्चास कूस राहिलेली नसली, तरी सक्तीच्या विम्याचा अवलंब करणें आज जरूर झालें आहे" इत्यादि मुद्दे सर टॉमस ह्यांनीं मांडले, त्यांत आक्षेप घेण्याजोगें कांहीं नाहीं. सक्तीच्या विम्याचा बोजा दर शंभर मैलांस प्रत्येक उतारूमागें एक आण्यापेक्षा जास्त बसणार नाहीं व रोज वहाण्यांत येणाऱ्या एक टन मालावर दोन आण्यांपेक्षां जास्त आकार येणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. विम्याची

सक्ती तात्काळ करण्यांत येणार नमून, कायदा पास झाल्यानंतर पांच वर्षे त्यास अवकाश आहे. रस्त्यावरील वहातुक लोहमार्गावर आणून रेल्वेजचें हित साधणारी बिलांतील कलमें मोटार वहातुकीच्या प्रगतीस आळा घालणारी व प्रांतिक सरकारांच्या अधिकारांचें संकोचन करणारी असली, तरी विम्याबाबतची योजना सर्वसंमत होईल, अशी अपेक्षा आहे.

## दि डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी लि.

**इंदूर येथील शाखेंत स्थानिक सल्लागार मंडळाची स्थापना**

सध्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. व्ही. अत्रे, बी. ए., एलएल. बी., हे फिरतीवर असून नुकतीच त्यांनीं इंदूर येथील शाखेस भेट दिली त्यावेळीं कंपनीचे शाखेचा औपचारिक उद्घाटन समारंभ श्रीमंत सौ. कमलाबाई साहेब किबे यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ११ मार्च रोजीं सायंकाळीं सहा वाजता कंपनीचे ऑफीसमध्यें होऊन स्थानिक सल्लागार मण्डळाची नेमणूक करण्यांत आली. सभेस उपस्थित असलेल्या मण्डळींत श्री. एम. के. कार्णिक, श्री. लोकनाथ त्रिवेदी वकील, श्री. सहस्रबुद्धे, श्री. साठे वगैरे प्रामुख्यानें दिसत होते. सभेंत कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. अत्रे, यांनीं कंपनीबद्दल माहिती सांगून नवीन विमा कायदा सुरू झाल्यानंतर कंपनीचें काम स्थानिक लोकांच्या सल्ल्यानें व विमेदारांस उपयुक्त व्हावें या हेतूनें सल्लागार मण्डळ नेमण्यांत येत असल्याचें सांगितलें. श्री. अत्रे हे सर्व शाखांस भेट देऊन स्थानिक लोकांच्या सल्ल्यानें विमा क्षेत्राचें निरीक्षण करीत आहेत.

### झारापकर टेलरिंग कॉलेज, दादर

पुणें येथील झारापकर टेलरिंग कॉलेजच्या चालकांनीं दादर (मुंबई) येथें झारापकर टेलरिंग कॉलेज, दादर, ह्या नांवाची संस्था स्थापिली आहे, तिचें उद्घाटन शुक्रवार, ता. १ एप्रिल १९३८ रोजीं श्री. जमनादास मेहता ह्यांचे हस्तें होणार आहे. वरील कॉलेजचा पत्ता 'पुंझा सिनेमा' समोर, लेडी जमशेटजी रोड, दादर' असा आहे.

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें

१९३९ च्या जानेवारीपासून साखर तयार करण्याकरितां सिंडिकेटनें ५०० एकर उसाची लागवड पुरी केली आहे. त्यामुळें १९३९ सालीं चार लक्ष रुपयांची साखर सिंडिकेट तयार करूं शकेल. १९४० च्या हंगामाकरितां आडसाली व सुरू मिळून १२५० एकर ऊंस लावला तर १९४० सालीं अकरा लक्ष रुपयांची साखर तयार करितां येईल.

मशिनरी पंढरपूर स्टेशनवर उतरून घेतली असून ती फॅक्टरीच्या जागेवर नेण्याचें काम चालू आहे. येत्या वर्षप्रतिपदेला अमृतसिद्धियोग आहे. ह्या शुभमुहूर्तावर मशिनरीच्या व इमारतीच्या उभारणीस प्रारंभ होणार असून १९४८ च्या नवंबरपर्यंत सर्व बांधकाम पुरें करतां येईल व १९३९ च्या जानेवारींत साखर तयार करण्यास प्रारंभ होईल.

दरसाल ५½% व्याजानें दोन वर्षे मुदतीच्या डिपॉझिट रकमा घेण्यास व व्याज दर सहा महिन्यांनीं देण्यास डायरेक्टर बोर्डानें मंजुरी दिली आहे.

पुणें
ता. २८-३-३८


विष्णु नारायण वर्तक,
अध्यक्ष.


## गव्हाचे पोहे
(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषत: लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५२ सदाशिव, पुणें २.
भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.



## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
## झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
**MARATHI KENDRA : 292 Sadashio Peth POONA**

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा तां. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

## हिंदुस्थानांतील स्वदेशी चळवळीचे लँकेशायरवर झालेले अनिष्ट परिणाम

### ब्रिटिश कापडाची विक्री ८५ टक्के कमी

ले:—प्रि. का. रा. झारापकर, डी. एफ. सी., लंडन, गोल्ड मेडॅलिस्ट, प्रिन्सिपॉल झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें.

लँकेशायरमध्यें कापसाच्या धंद्याच्या लहान मोठ्या मिळून एकंदर ३,००० फर्म्स असून स्त्रिया आणि पुरुष मिळून सुमारें ४ लक्ष लोक या धंद्यांत पडलेले आहेत. तसेंच, या धंद्यांत कमींत कमी १५ कोटि पौंड रक्कम गुंतलेली आहे. एवढ्या अवाढव्य प्रमाणांत चालू असलेल्या ह्या धंद्याच्या चालू परिस्थितीविषयीं पूर्ण कल्पना येण्यासाठी आणि उज्वल भवितव्य गाठण्याचा प्रयत्न करण्यासाठी मिळून या धंद्यांतील प्रमुख व्यापाऱ्यांची एक संयुक्त समिती नुकतीच इंग्लंडमध्यें भरली होती. त्या समितीनें आपला अहवाल छापून प्रसिद्ध केला असून त्याच्या प्रती पार्लमेंटच्या सर्व सभासदांना वाटलेल्या आहेत. त्या अहवालांत, महायुद्धानंतरच्या कालांत लँकेशायरची एकंदर कापडाची निर्यात जरी $\frac{३}{४}$ नें कमी झालेली असली तरी सध्या देखील लँकेशायर हें कापडनिर्यातीचें जगांतील सर्वांत मोठें शहर कसें आहे आणि इंग्लंडच्या परराष्ट्रीय व्यापाऱ्यांस दुसऱ्या कोणत्याहि मालापेक्षा कापडासच प्रथम स्थान कसें द्यावें लागेल हें सोदाहरण पटवून दिलें असून हिंदुस्थानांतील स्वदेशी चळवळीमुळें आणि जपानच्या पद्धतशीर व्यापारी आक्रमणामुळें दिवसेंदिवस कसें नुकसान होत आलें आहे याचें उत्कृष्ट चित्र रेखाटलेलें आहे. शेवटीं, सरकारनें आपणांस सर्व प्रकारें मदत केल्याखेरीज आपला तरणोपाय नाहीं म्हणून मदतीसाठी सरकारकडे त्यांत याचनाहि केली आहे.

### हिंदुस्थानामुळें उपासमार

वर सांगितल्याप्रमाणें महायुद्धानंतर जो एकंदर व्यापार घटलेला आहे त्यापैकी एकट्या हिंदुस्थानांतच ८५ टक्के व्यापार घटलेला आहे. महायुद्धापूर्वी तर लँकेशायरमधील मालावर आपल्याकडील लोकांच्या इतक्या उड्या पडत असत कीं एकट्या आमच्या देशाच्या मागणीच्या जोरावर लँकेशायरमधील एक तृतीयांश गिरण्या रात्रंदिवस चालत असत. परंतु आज तो मनु पूर्णपणें पालटलेला आहे. येथील स्वदेशी चळवळीमुळें, अर्थात् आमच्याकडील कापडाच्या गिरण्यांच्या मालाला वाढत्या प्रमाणांत मिळत असलेल्या मागणीमुळें, येथें ब्रिटिश माल इतक्या कमी प्रमाणांत विकला जाऊं लागला आहे कीं, हिन्दुस्थानच्या व्यापारावर एकाकाळीं वैभव भोगीत असलेले लँकेशायरमधील लोक आज काहींशा उपासमारींत दिवस कंठीत असून तेथील कित्येक गिरण्या तर ओसच पडलेल्या आहेत.

### जपानचें पद्धतशीर व्यापारी आक्रमण

लँकेशायरमधील व्यापाऱ्यांस आज एकट्या जपानची जेवढी भीति वाटत आहे तेवढी ती इतर युरोपियन अगर अमेरिकन व्यापाऱ्यांची वाटत नाहीं. कारण इतर यांत्रिक प्रगतीप्रमाणें जपाननें कापसाच्या धंद्यांतहि इतकी प्रगति केलेली आहे कीं आज जपानी कापड नसलेली अशी जगांतील एकहि बाजारपेठ सांपडत नाहीं. तसेंच जपानमध्यें हल्लीं तयार होणारा माल इतका सफाईदार व मोहक पण किंमतीनें इतका स्वस्त असतो कीं त्याच्याशीं स्पर्धा करणें कोणाच्याहि आटोक्याच्या बाहेरचें आहे.

आज इतर देशांप्रमाणेंच इंग्लंडमध्यें स्वार्थांध लोक नाहींत असें नाहीं. कारण खुद्द जपानमध्यें पूर्णपणें तयार झालेला माल फिनिशिंगसाठी म्हणून इंग्लंडमध्यें येऊन पुन्हा त्यांतील शेकडा ९० टक्के माल "इंग्लिश फिनिश" म्हणून बाहेरील देशांत विकला जातो आणि लोक मात्र माल इंग्लंडचा आहे या समजुतीनें माल खरेदी करतात व त्याचा फायदा जपानला मिळत असतो. अशा प्रकारें फिनिशिंगसाठी म्हणून गेल्या नऊ महिन्यांत सुमारें २३ लक्ष, ८४ हजार चौरस वार कापड जपानमधून इंग्लंडला गेलें होतें. याखेरीज यापुढेंहि जपाननें आणखीं एक पाऊल टाकून, तेथील खेड्यांना इंग्लंडमधील प्रमुख शहरांचीं नांवें दिलेलीं आहेत व त्यामुळेंहि लोकांची दिशाभूल होऊन ब्रिटिश बनावटीचा म्हणून लोकांच्या पदरीं जपानी माल मात्र पडतो.

तसेंच, जपानमधील मजूरी इंग्लंडमधील मजूरीपेक्षां पांच पटीनें कमी पडत असल्यामुळें आणि जपानची धंदा करण्याची हातोटी इंग्लंडपेक्षा सरस असल्यामुळें आज इंग्लंडला जपानशीं व्यापारी स्पर्धा करणें फारच अशक्य झालें आहे. अशा प्रसंगीं लँकेशायरमधील व्यापाऱ्यांनीं, जपानच्या मालावर कडक जकात बसवावी आणि सर्व ब्रिटिश साम्राज्यभर आपला माल घेतला जाईल अशा प्रकारची व्यवस्था करावी अशी विनंति पार्लमेंटला केल्यास त्यांत विशेष आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं.

### प्राप्तीवरील कराचे उत्पन्नांत मुंबई प्रांताचा हिस्सा

प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नापैकीं नीमायर योजनेवर अनुसरून प्रांतिक सरकारच्या वांट्यास येणारी रक्कम चालू सालीं १$\frac{३}{४}$ कोटि रुपये भरते, तिच्यापैकी मुंबई प्रांतास २५ लक्ष रुपये मिळावयाचे आहेत. मध्यवर्ति सरकारास चालू वर्षअखेर वरील करापासून किती उत्पन्न होईल ह्याविषयीं अंदाज बांधून, प्रांतांत वांटणी करण्यांत आली आहे. प्रत्येक प्रांताचा हिस्सा मार्च अखेर त्यांस अदा केला जाईल व नक्की आकडा हिशेबांत निघेल, तेवढ्या रकमेपेक्षा कमी अगर अधिक रक्कम दिली गेली असेल त्याप्रमाणें देणें-घेणें भागवून हिशेब पुरा केला जाईल. मुंबई सरकारनें, आपल्या अंदाजपत्रकांत, नीमायर योजनेस अनुसरून ह्या प्रांतास २७ लक्ष रुपये मिळतील, असें गृहीत धरलें आहे.

अप-टु-डेट शिलाई करतां
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणे] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

## कोंकणांतली सहकारी परिस्थिति

कोणत्याहि आर्थिक किंवा सामाजिक संघटित प्रयत्नांच्या मुळाशी निश्चित तत्त्वें असलीं तरी तीं कृतींत उतरवलीं जात असतां निरनिराळ्या घटकांची भिन्नभिन्न नैसर्गिक आणि समाजरचनाविषयक परिस्थिति लक्षांत घेणें आवश्यक असतें. विशिष्ट प्रकारच्या राजकीय व आर्थिक घडामोडी जोरानें चालू असतां ह्या तऱ्हेचा तारतम्यमूलक व व्यावहारिक विचार अधिकच आवश्यक असतो. ही विचारसरणी सहकारी चळवळीची सध्याची परिस्थिति आणि ती सुधारण्याचे उपाय ह्यांस लागू होणें स्वाभाविक आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील सहावी संगमेश्वर तालुका सहकारी परिषद् गेल्या जानेवारी महिन्यांत देवळें येथें भरली होती, तिचा अहवाल आमचेकडे आला आहे, तो वाचून वरील विचारांच्या महत्त्वास पुष्टी मिळते. मुंबई इलाख्यांत गुजराथ, मध्यभाग, कर्नाटक व कोंकण ह्यांमध्यें नैसर्गिक व सामाजिक भिन्नत्वामुळें तेथील सहकारी संस्थांच्या स्वरूपास विशिष्ट वळण लागलें आहे आणि त्यांच्या अडचणींचा व प्रश्नांचा विचार करतांना हें भिन्नत्व ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. जमिनींचा प्रकार, हवा, पाऊसपाणी, पिकांच्या जाती, जमीनधारणाच्या परंपरागत पद्धति, उद्योगधंदे व व्यापार ह्यांची परिस्थिति इत्यादि बाबतींत कोंकणांतले जिल्हे वैशिष्ट्यपूर्ण आहेत आणि त्यांचे प्रश्न ह्या वैशिष्ट्यास अनुलक्षून सोडवले पाहिजेत.

देवळें परिषदेचे स्वागताध्यक्ष, श्री. आठल्ये, ह्यांनीं आपल्या भाषणांत संगमेश्वर तालुक्यांतील सहकारी पतपेढ्यांच्या परिस्थितीसंबंधानें आकडेवार माहिती दिली, तीवरून इलाख्यांतील इतर कित्येक भागांप्रमाणें तेथें सोसायट्यांत थकबाक्या फुगल्या असून ठेवीदारांचे पैसे परत करणें व त्यांवरील व्याज देणेंहि कठीण होऊन गेल्याचें दिसतें. ह्याकरितां कर्जवसुलीची विशेष योजना अमलांत आणून दुःस्थितीच्या चक्रांत सांपडलेल्या पेढ्या स्वतःच्या पायावर पुनः नीट उभ्या राहतील अशी तजवीज करणें अगत्याचें आहे. सहकारमंत्री, श्री. मुरारजी, ह्यांनीं कायदेमंडळांत नुकतेंच महत्वाचें भाषण केलें त्यावरून सहकारी संस्थांच्या सद्यःस्थितीविषयीं वास्तविक कल्पना त्यांस चांगली आली असल्याचें स्पष्ट दिसतें. पेढ्यांच्या सभासदांच्या फायद्यासाठी त्यांनीं बाहेरचें कर्ज घेतलें. त्याची फेड करण्याची जबाबदारी प्रयत्नेंकरून आपण पार पाडली पाहिजे ह्याची जाणीव सभासदांमध्यें नसते, हा आमच्या चळवळींतला ठळक दोष आहे. चळवळीची पुनर्घटना करण्याचें कार्य प्रधानमंडळानें हातीं घेतलें आहे. सहकारी खात्यानें ह्या निश्चयास अनुसरून इलाख्याच्या निरनिराळ्या भागांतली भिन्नभिन्न विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे आणि तिला अनुलक्षून उपाय-योजना आखली पाहिजे. सहकारी चळवळीचें मूलभूत तत्त्व आणि सहकारी संस्थांच्या घटनेचें वैशिष्ट्य ह्यांची ओळख लोक विसरले किंवा त्यांस ती ओळखच झाली नाहीं तर तिच्या हितकारी परिणामांचा लाभ जनतेस कसा मिळणार? निःस्वार्थी व तत्त्वशील कार्यकर्ते चळवळींत नसल्यानें तिला सध्याची स्थिति प्राप्त झालेली आहे, ह्या आशयाचे उद्गार खुद्द सहकारमंत्र्यानीं काढले आहेत. खरें पहातां प्रांताच्या निरनिराळ्या भागांतल्या सहकारी संस्थांच्या अडचणी प्रांतिक इंस्टिट्यूट व सहकारी खात्याचे अधिकारी ह्यांनीं सहविचारानें व सहकार्यानें दूर केल्या पाहिजेत. परंतु इंस्टिट्यूटची प्रस्तुत अवस्था काय झाली आहे हें दिसतच आहे. ती व इतर सहकारी संस्था ह्यांच्या पुनर्घटनेचें व सुधारणेचें कार्य सरकारनें आतां आपल्या हातीं घेतलें असल्याचें प्रसिद्ध आहे. त्या कार्यक्रमाचा एक महत्वाचा भाग म्हणून निरनिराळ्या जिल्ह्यांच्या विशिष्ट परिस्थितीचा काळजीपूर्वक विचार होणें जरूर आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या अडचणी काय आहेत ह्याविषयींचा खुलासा श्री. आठल्ये ह्यांच्या भाषणांत झालेला असून त्या सोडवण्याचे उपाय देवळें येथील परिषदेंत मान्य झालेल्या ठरावांत सुचवलेले आहेत. त्यांकडे सहकारी अधिकाऱ्यांचें लक्ष जाऊन त्यांचा व्यापक विचारानें, दूरदृष्टीनें व सहानुभूतीनें निकाल लावला जाईल अशी रत्नागिरी जिल्ह्यांतल्या सहकारी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे, ती चुकीची आहे असें कोण म्हणेल? इलाख्यांत सामान्य जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचें अत्यंत आवश्यक पण अवघड कार्य करण्याची जबाबदारी प्रांतिक प्रधानमंडळानें उचलली आहे हें अभिनंदनीय आहे. जिल्ह्यांतल्या जबाबदार व लोकहिततत्पर सहकारी कार्यकर्त्यांचें सहाय त्यास ह्या कामीं अवश्य मिळेल. अधिकारी व बिनअधिकारी कार्यकर्त्यांच्या अशा सहकार्यावांचून निरनिराळ्या क्षेत्रांतले विशिष्ट स्वरूपाचे आर्थिक प्रश्न व्यवस्थित रीतीनें व विचारपूर्वक सोडवले जाणें अशक्य आहे.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६४८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार ( फॉरिन एक्स्चेंज )

**प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान**

इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें शाखेच्या विद्यमानें वरील विषयावर प्रो. काळे ह्यांचें पहिलें व्याख्यान झालें, त्याचा गोषवारा खालीं दिला आहेः—

( १ ) हा विषय गुंतागुंतीचा व जिज्ञासूस घोटाळ्यांत पाडणारा आहे अशी सामान्य समजूत असून समग्र रामायण ऐकून रामाची सीता कोण एवढीच शंका असणाराप्रमाणें ती कांहीं अंशीं खरीहि आहे. तथापि, प्रस्तुत प्रश्नाच्या मुळाशी असलेलीं शास्त्रीय तत्वें नीट ध्यानांत आल्यास त्यांतली गुंतागुंत सोडवतां येते.

( २ ) चलन व पत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार ह्या विषयींचे अर्थशास्त्रीय सिद्धांत प्रारंभीं चांगले समजून घ्यावे.

( ३ ) कोणत्याहि प्रकारचें देणें-घेणें झालें कीं त्या विनिमयास एक्सचेंज म्हणतात. अलीकडल्या काळांत वस्तु किंवा सेवा ह्यांचा मोबदला पैशाच्या माध्यमानें होतो. प्रत्येक राष्ट्रांतल्या व्यक्ती धंदा म्हणून व स्वतःच्या फायद्यासाठी अंतर्गत व्यापाराप्रमाणें परदेशांशीं देण्याघेण्याचा व्यवहार करतात.त्यास समुच्चयवाचक संज्ञा राष्ट्रीय आयात-निर्गत व्यापार अशी असून राष्ट्राराष्ट्रांत होणाऱ्या देवघेवीस आंतरराष्ट्रीय व्यापार असें म्हणतात.

( ४ ) ह्या परराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहाराची नोंद प्रत्येक राष्ट्रांत कस्टम्स खात्यामार्फत होते आणि त्याच्या आयात-निर्गत व्यापाराचा ताळेबंद-'बॅलन्स ऑफ ट्रेड' तयार केला जातो.निर्गत व्यापारामुळें परराष्ट्रांकडे "येणें" निघतें, तर आयात व्यापारानें त्यांचें "देणें" उत्पन्न होतें. मालाच्या ह्या देण्याघेण्याची वजावाट करून बाकी राहील, त्या किंमतीचें सोनें देण्याची व घेण्याची वहिवाट आहे.

(५) परंतु हा व्यापारी ताळेबंद राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीच्या दृष्टीनें अपुरा होय. त्यांचीं अनेक देणीं-घेणीं निघतात, तीं माल, सोनें-चांदी ह्यांच्या व्यापाराच्या संबंधांत नसल्यानें त्यांची नोंद कस्टम्स खात्याच्या दप्तरांत होत नाहीं. ह्यामुळें केवळ मालाच्या आयात-निर्गतीच्या किंमतींत मोठी तफावत दिसून येते. ब्रिटिश राष्ट्रांत निर्गतीपेक्षां आयात अधिक होते आणि हिंदुस्थानांतला प्रकार ह्याच्या उलट आहे. ह्यावरून इंग्लंड कायमचें देणेंकरी व हिंदुस्थान घेणेंकरी आणि श्रीमान राष्ट्र आहे असें अनुमान काढावयाचें नाहीं. ब्रिटनमध्यें आयात अधिक होते ह्याचें कारण त्यांतली बरीचशी, त्या राष्ट्रानें दुसऱ्याची कामगिरी केलेली असते, तिचा मोबदला म्हणून त्यास मिळते. ह्याच्या उलट, परकी भांडवलावरचें व्याज, नफा, येथील ब्रिटिश नोकरांचीं पेन्शनें वगैरेची फेड जादा माल बाहेर पाठवून हिंदुस्थानास करावी लागते. ह्या जादा आयात-निर्गतीबद्दलचा मोबदला हिशेबाच्या दोन बाजूंस 'अदृश्य' निर्गत व आयात या सदरांत दाखल केला असतां राष्ट्रीय ताळेबंदाची तोंडमिळवणी होते आणि तिला "बॅलन्स ऑफ अकौंट्स" म्हणतात.

( ६ ) प्रत्येक देशाचें चलन निराळें असतें, परंतु त्या सर्वांस सोन्याचा आधार असल्यानें विशिष्ट प्रमाणांत सोन्याची देवघेव केली असतां आंतरराष्ट्रीय देणें-घेणें भागवतां येतें. परंतु प्रत्येक आयात-निर्गत व्यापाराच्या व्यवहाराबद्दल सोनें बाहेर पाठवावयाचें किंवा बाहेरून आणावयाचें म्हटल्यास ही अत्यंत दगदगीची व खर्चाची देवघेव होईल. ती वांचवून परराष्ट्रीय व्यापारी देणेंघेणें सुकर होण्यासाठीं हुंड्या विकून व विकत घेऊन जी व्यवस्था करतात, तिला परराष्ट्रीय हुंडणावळ किंवा 'फॉरिन एक्सचेंज' म्हणतात.

( ७ ) माल निर्गत करणाऱ्या व्यापाऱ्यास परदेशांतून आपल्या गिऱ्हाइकाकडून त्याची किंमत मिळण्याचा हक्क उत्पन्न होतो व तो धनको बनतो. ह्याच्या उलट, त्याच रीतीनें आयात करणारा व्यापारी परराष्ट्रीय धनकोचा रिणको होतो. पैसा मागण्याचा हक्क हुंडींत किंवा "बिल ऑफ एक्सचेंज "मध्यें नमूद केला जातो आणि त्याची विक्री-खरेदी करतां येते, ही मोठी सोय आहे. प्रत्येक देशांत ह्याप्रमाणें धनको व ऋणको निर्माण होतात आणि त्यांनीं पैसे घेण्याच्या हक्काची विक्री-खरेदी केली असतां दोघांची येणें मिळण्याची व देणें देण्याची एकाच वेळीं सहज सोय होते.

( ८ ) ह्या देशांतील "अ "नें काढलेली परदेशांतल्या "ब " वरची हुंडी येथील आयात व्यापारी "क " विकत घेऊन ती आपल्या परराष्ट्रीय धनको "ड "स तिकडे पाठवतो. तिकडे "ड" ही हुंडी आपला देशबंधू "ब " ह्यावर लावून पटवून घेतो आणि त्या दोघांचें देणें-घेणें होतें. ह्या रीतीनें सोनें किंवा नाणें न पाठवतां किंवा आणतां हुंड्यांच्यामार्फत मालाच्या देवघेवीचें येणें-देणें भागवलें जातें. हें " फॉरिन एक्सचेंज "चें अत्यंत साधें उदाहरण आहे.

( ९ ) ह्या परराष्ट्रीय घेण्या-देण्याबाबतच्या हुंड्या कोणत्या दरानें आणि कशा विकल्या किंवा विकत घेतल्या जातात हा प्रस्तुत विषयाचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचें विवेचन दुसऱ्या व्याख्यानांत मी करणार आहें.

---


## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## तांबवे को. लिफ्ट इरिगेशन सोसायटी

तांबवे, तालुका–वाळवा

( लि. आ. म. )

आपलें सरकार असलें म्हणजे लोककल्याणाच्या गोष्टी कशा तावडतोब अमलांत आणल्या जातात याचें उदाहरण पहावयाचें झालें सर तांबवे लिफ्ट इरिगेशन या सोसायटीचें दाखवितां येईल. वरील सोसायटी स्थापन करण्याचें काम बरेच दिवसांपासून लांबकळत राहिलें होतें, आणि कॉंग्रेसनें जर राज्यकारभार हातांत घेण्याचें ठरविलें नसतें तर ही सोसायटी स्थापन झाली असती कीं नाहीं, याबद्दल शंकाच होती. पण जेव्हां कृषिमंत्रि नामदार मुरारजी देसाई यांनीं सातारा जिल्ह्याला भेट दिली आणि ज्यावेळीं त्यांच्या कानावर वरील सोसायटीची गोष्ट तिच्या पुढाऱ्यांनीं घातली त्यावेळीं लगेच ती रजिस्टर होऊन आली.

सदर सोसायटीची पहिली वार्षिक साधारण सभा रविवार ता. १३ मार्च १९३८ रोजीं मुंबई प्रॉ. को. बँकेच्या सातारा भागचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. गायतोंडे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस एकंदर ५० वर लोक उपस्थित असून त्यांत श्री. देशपांडे, ऑडिटर, इस्लामपूर, श्री. विचारे, अ. ऑर्गनायझर, श्री. मोकाशी, एजंट, इस्लामपूर शाखा, आणि कोल्हापूरचे श्री. पाटील, इंजिनियर इ. प्रमुख होते. श्री. गायतोंडे यांनीं सहकारी चळवळींत सातारा जिल्हा अग्रभागीं असून त्यांत होणारी प्रगति महत्वाची आणि आशादायक असल्याचें सांगितलें. तसेंच अशा तऱ्हेची उत्पादक व सहकारी तत्वाची कसोटी पाहणारी संस्था काढून ती चालवितांना कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल सूचना देऊन पुढाऱ्यांनीं अशा संस्था व्यापारी धोरण ठेवून कशा चालवाव्या याबद्दलहि विवेचन केलें.

या सोसायटीमुळें तांबवे आणि वहे या गांवांतील सुमारें १५० एकर क्षेत्र चालू सालीं ऊंस, हळद वगैरे बागायती पिकांनीं व्यापिलें जाणार असून १०००-१५०० एकर जिराईत जमिनीचें बागायत जमिनींत रूपांतर होणार आहे.

कृष्णा नदीच्या ८-९ मैल लांबीच्या डोहाच्या पाण्यावर ही योजना आखली असून कोल्हापूर येथील प्रसिद्ध इंजिनियरिंग फर्म मे. पाटील आणि कं. इचे देखरेखीखाली पाणी वांटण्याची व्यवस्था होणार आहे.

अशा तऱ्हेनें ही नवीन संस्था १।२ वर्षांतच येथील पुढारी व सहकारमुख्बी आणि डिव्हिजनल बोर्ड ऑफ ॲग्रि. सभासद श्री. धोंडजी पांडुरंग पाटील यांचे नेतृत्वाखाली यशस्वी होऊन जिल्ह्यांतील एक आदर्श संस्था होईल यांत बिलकूल संशय नाहीं. सरकारच्या नवीन धोरणाप्रमाणें शेतकी खात्यानें या ठिकाणीं कांहीं प्रात्यक्षिकें करून त्या द्वारे या नवीन होतकरू शेतकऱ्यांना शेतींत कशी सुधारणा करावी व किफायतशीर शेती कशी करावी हें दाखवून द्यावें आणि 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ट नोकरी,' या जुन्या म्हणीचें प्रत्यंतर खेड्यांतून शहरांत जाऊन 'मजूर' बनणाऱ्या शेतकऱ्याला पटवून द्यावें.


घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत–मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,०००  विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३०,२५०  वसूल झालेलें भांडवल १,१४,७५५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर-बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११८—४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०४—० |
| ४% १९४३ | १०८—० |
| ३½% बिनमुदत | ९८—½ |
| ३½% १९४७–५० | १०६—० |
| २¾% १९४८–५२ | १००—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९–१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०८–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०८–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४३—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११४–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३१—६ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५३५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११६–१२ |

### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७५०—० |

### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १२०–१० |
| कराची ( १०० ) ९% | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४१२—८ |

### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १५८—२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४४—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४,३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०५–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १७३—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २३८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १०३५—० |

### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३४–१४ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५०—६ |


द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर–मुंबई.
यांचे ओरिजिनल
ब्राह्मी तेल
मेंदूचे विकार व डोके दुखणें यावर
बाळंत काढा
मुलांकरितां बाळकडू.
कुमारी आसव
नं. १ दहा दिवसांत घेणेचा.
नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.
मुख्य दुकान: ठाकुरद्वार, शाखा: परळ व दादर.

पुणें एजंट:—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

वन्देमातरम शिकाकई साबु
स्टॉकिस्ट: मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७५९ लक्ष्मी रोड–गणपती चौक–पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

हंस चित्र ज्वाला

पत्नी ही पुण्याच्या मार्गावरील ज्योति आहे पण पापाच्या मार्गा- वर—त्या मार्गावर याच ज्योतीची ज्वाला होते

ज्वाला

पुरी भडकली

प्रलय ! प्रलय कधींच झाला आहे ! बाहेर माणसं मुंग्यासारखीं चिरडलीं जात आहेत. मान वर करून बसणाऱ्यांच्या डोक्याच्या खांचा होत आहेत; कोंवळ्या पोरींच्या कपाळचं कुंकू पुसलं जात आहे; तुरुंग भराभर भरत आहेत ! राजवाड्यांत मुळमुळु रडत बसणाऱ्याला तो प्रलय कोठून दिसणार !—

—वि. स. खांडेकर

भूमिका :

चंद्रमोहन
रत्नप्रभा
आशालता
विनायक
मांडरे
रजनी
ढवळे
इ. इ. इ.

लेखक : वि. स. खांडेकर
दिग्दर्शक : विनायक
छाया चित्रण : पांडुरंग नाईक
रेकॉर्डिंग : चिंतामणराव मोडक
पटकथा लेखक व संकलक : र. शं. जुन्नरकर
कला : पळणिटकर
संगीत : खांसाहेब घम्मनखां

मार्मिक संवाद — मधुर संगीत — भव्य देखावे — अभिजात अभिनय

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वीं आपला विमा उतरवून नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचे ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि०

पुणें २.

शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.